

# दुग्ध व्यवसायामध्ये वासरांचे संगोपन

दुग्ध व्यवसायामध्ये वासरांचे संगोपन अतिशय महत्त्वाचे आहे. दुग्ध व्यवसायाचा पाया म्हणजे आपल्याकडे असणारी वासरे. जन्माला येणारे वासरू सुदृढ आणि निरोगी असेल तरच आपला दुग्ध व्यवसाय फायदेशीर होऊ शकेल. त्यामुळे वासरांचे संगोपन आणि व्यवस्थापनाकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहीजे.

**वासरू जन्माला येण्यापूर्वी घ्यावयाची काळजी :**

वासराचे पोषण हे गाईच्या गर्भाशयातच सुरू होते. गाभण काळात गाईंची काळजी घेतली नाही तर जन्माला येणारं वासरू अशक्त राहते. त्याच्या वाढीचा दर सरासरीपेक्षा कमी राहतो किंवा ते विविध संसर्गजन्य रोगास बळी पडतात. यासाठी गाईचे आहार व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. वासराची काळजी गाईच्या गर्भाशयात असल्यापासून घेतली पाहिजे. गाईचा गाभण काळ एक ते तीन महिने, चार ते सहा महिने आणि सात ते नऊ महिने या तीन विभागांत विभागला जातो. यामधील शेवटचा म्हणजे सात ते नऊ महिन्याचा काळ अतिशय महत्त्वाचा असतो. कारण वासराच्या एकूण वाढीच्या दोन तृतीयांश एवढी वाढ या काळात होते.

वासराचा जन्म नैसर्गिकरीत्या होणे हे गाय आणि वासरु या दोघांच्या हिताचे आहे. परंतू गाय विण्यामध्ये काही अडचण आल्यास ताबडतोब पशुवैद्यकाकडून ती दूर केली पाहिजे. वासराचा जन्म झाल्यानंतर प्रथम त्याच्या नाकातील चिकटद्राव काढून नाकपुडया स्वच्छ केल्या पाहिजेत. म्हणजे वासराला श्वाच्छोश्वास करण्यास सुलभ होते. तसेच वासराच्या अंगावरील चिकटद्राव गोणपाटाने पुसून काढावा. याकरिता वासरु हे गायीपुढे ठेवल्यास गाय आपल्या लांबसडक जीभेने वासराला चाटते आणि त्याला स्वच्छ करते. त्यामुळे वासराचे रक्ताभिसरण योग्यप्रकारे होण्यास मदत होते. सशक्त वासरु जन्मल्यानंतर २० ते ३० मिनिटात उभे राहून चालावयास लागते, नाहीतर सुरुवातीला उभे करण्यासाठी आधार दयावा लागतो. वासराचे अंग स्वच्छ केल्यानंतर त्याची नाळ बेंबीपासून दीड ते दोन इंच अंतरावर नवीन ब्लेडने किंवा कात्रीने कापुन स्वच्छ निर्जतुक दोऱ्याने बांधावी. दोरा आयोडीनच्या द्रावणात बुडवून घ्यावा. नाळ निर्जतुक केली नाही तर त्यावाटे जंतुंचा संसर्ग होतो. नाळेप्रमाणे वासराचे समोरील नाजुक पांढरे खुरही कापले पाहीजे, हे खुर सहज कापता येतात.

वासरास जन्मल्यानंतर अर्धा ते एक तासाच्या आत चिक पाजणे आवश्यक असते. पहिले चार ते पाच दिवस वासराला चिक हा मिळालाच पाहिजे. तो देखिल वासराच्या वजनाच्या १/१० पट एवढा चिक आवश्यक असतो. कारण चिकामध्ये दुधापेक्षा तीन ते चार पट जास्त ‘अन्नघटक’ असतात. चिकामधून वासराला भरपुर प्रमाणात प्रथिने मिळतात. याचबरोबर ‘अ’ जीवनसत्वाचा भरपुर पुरवठा झाल्याने वासरामध्ये रोगप्रतिबंधक शक्ती निर्माण होते. चिक सारक असल्याने वासराच्या पोटातील मळ निघून जातो आणि पचनशक्ती व्यवस्थीत होण्यास मदत होते. चिकामध्ये खनिजद्रव्ये मोठयाप्रमाणात असल्यामुळे वासराच्या शरीराच्या वाढीस त्यांचा उपयोग होतो.

प्रकाशन
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, संशोधन अनुदान अंतर्गत

सुरुवातीला दुध पाजण्याकरिता वासरांना शिकवावे लागते. याप्रकारात तापविलेले दुध थंड करुन उथळ भांडयात घेऊन त्यामध्ये हाताची बोटे बुडवून दुधातून बोटे वर काढावीत. वासरु बोटे चाटावयास लागले की, बोटे हळूहळू खाली घ्यावीत. एक दोनवेळा असे केल्यास वासरु आपोआप भांडयात दुध प्यायला लागते. वासरांना स्तनास न पाजता, गरजेनुसार वजनाच्या प्रमाणात वरच्या दुधावर पोसण्याची किंवा घमेल्यात दुध घेवून वासराला पाजण्याची पद्धत प्रचलित आहे. या पद्धतीत वासरु मेले तरी दुभते जनावर पान्हा न चोरता दुध देते. तसेच वासराचे तोंड कासेस लागल्यामुळे दुधात अस्वच्छता, रोगजंतुंची वाढ होण्याची शक्यता असते आणि निरोगी आणि निर्मळ दुध मिळू शकत नाही. वासराला मोजके आणि आवश्यक तेवढेच दुध निश्चितपणे देता येते. तसेच दुध तापवून थंड करुन, म्हणजेच निर्जतुक करुन पाजता येते. जरुरी असलेली औषधे दुधातून पाजता येतात. तसेच दुधाला पर्यायी पदार्थ लवकर वापरता येतात आणि वासराकडून गायीला त्रास होण्याचा प्रश्न येत नाही. तसेच गायीचे सड देखिल खराब होत नाहीत आणि रोगाचा फैलाव हा टाळता येतो.



वासरांच्या संगोपनात आहारास प्राधान्य आहे. वासराला दोन ते तीन आठवडयापर्यंत बालसुग्रास सारखे पशुखाद्य देण्यास सुरुवात करावी. हळूहळू पशुखाद्य वाढवून सहा महिन्यांपर्यंत दिड किलोपर्यंत 'खुराक' वाढवावा. वासराला वरुन दुध दिल्यास, वासरु दोन ते अडीच महिन्याचे असताना दुध बंद करता येते. वासरु एक महिन्याचे झाल्यावर हिरवी वैरण दयावी, त्यात लसुणघास, बरसीम, चवळी, हिरव्या मक्याचा पाला यांचा समावेश करता येतो. गाईपासून वेगळे करण्याच्या पद्धतीमध्ये वासराला जन्मल्यानंतर लगेचच किंवा तीन दिवसांनी गाईपासून वेगळे केले जाते (म्हणजे चीक दूध असेपर्यंत वासरू गाईबरोबर ठेवले जाते). स्वतंत्र अशा स्वच्छ व निर्जंतुक भांड्यामध्ये वासरांना त्यांच्या वजनाच्या प्रमाणात आणि आवश्यकतेनुसार ठराविक कालावधीमध्ये दूध पाजले जाते. पाश्चात्त्य देशामध्ये किंवा मोठ्या मोठ्या गोठ्यांमध्ये या पद्धतीचा अवलंब केला जातो. गाईपासून वासरे वेगळी ठेवणे नक्कीच फायद्याचे असते, परंतु यासाठी स्वच्छतेचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. यामध्ये वासराला पाहिजे त्या प्रमाणात त्याच्या शारीरिक गरजेनुसार दूध पाजले जाते. त्यामुळे वासराचे आरोग्य चांगले राहून त्याची योग्य ती वाढ होते. जरी वासरू अचानक दगावले किंवा विकले तरी गाय नियमित दूध देते. गाईच्या तंतोतंत दूध उत्पादनाची नोंद ठेवता येते. नको असलेली वासरे कमी वयातच कळपातून काढून टाकता येतात. वासराशिवाय धार काढल्यामुळे स्वच्छ दूधनिर्मिती होते. अशा प्रकारे वासरांची योग्य काळजी घेणे दुग्धव्यवसायात महत्त्वाचे आहे.

www.mafsu.in

www.knpcvs.in

✲ मार्गदर्शक ✲

**कर्नल प्रा. (डॉ.) ए. एम. पातुरकर**
मा. कुलगुरु, मपमविवि, नागपुर

**डॉ. एस. व्ही. उपाध्ये**
अधिष्ठाता, पशुविज्ञान विद्याशाखा,
मपमविवि, नागपुर

**डॉ. एन. व्ही. कुरकुरे**
संचालक संशोधन,
मपमविवि, नागपुर

**डॉ. ए. यु. भिकाने**
संचालक विस्तार शिक्षण,
मपमविवि, नागपुर

**डॉ. व्ही. डी. आहेर**
सहयोगी अधिष्ठाता
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

✲ संकलन ✲

**डॉ. स्मिता आर. कोल्हे**
संशोधन प्रकल्प प्रमुख, पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

**संपर्क : टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३२६८ सकाळी १० ते सायं. ६ वा.**